# अध्यापक विद्यालयातील अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासिता प्रात्यक्षिक कार्य.... एक चिकित्सक अभ्यास

**डॉ.सौ.उज्वला केशवराव सदावर्ते,** प्राचार्या, विवेकवर्धिनी अध्यापिका महाविद्यालय, नांदेड.
**सौ. आशा अशोक येल्हेकर,** प्राध्यापिका, ज्ञानवर्धिनी अध्यापक महाविद्यालय, हिंगोली

---

**प्रस्तावना :—**

प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचे सार्वत्रीकीकरण करण्यासाठी शासनाने शाळेच्या शिक्षकांच्या अध्यापना संबंधी अनेक उपाययोजना राबविलेल्या आहेत. डॉ.दवे समितीने सुध्दा प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात किमान अध्ययन पातळी' सुचविलेली आहे. क्षमताधिष्टीत अध्यापन प्रक्रियेमुळे शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जात असतांना असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षणाचा दर्जा हा खालावत चाललेला आहे.

ज्या प्रमाणे एखाद्या व्यवसाया करीता त्या व्यवसायातील तज्ञ व्यक्तिची गरज असते त्याप्रमाणे प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकी व्यवसायामध्ये पदार्पण करण्यापुर्वी छात्राध्यपाकांना आपल्या व्यवसायाकरीता आवश्यक असलेल्या गोष्टीची अनूभूती देणे आवश्यक आहे.

कारण आंतरवासिता (सलग शालेय अनुभूती )कार्यक्रमाचे वेळी प्रशिक्षणार्थी शाळेत शिक्षकांच्या प्रत्यक्ष संपर्कात येतात व अनुभवांची देवाण—घेवाण होते. या काळात प्रशिक्षणार्थी नियोजनाचे व व्यवस्थापनाचे महत्व जाणून घेतो. प्रत्येक गोष्ट अचूकपणे करण्याची सवय शिक्षक प्रशिक्षणार्थ्यामध्ये रुजते. शिक्षक प्रशिक्षणार्थी व संबंधित शाळेतील सर्व मानवी, अमानवी घटक यांच्या एक्त्रीत परिणामामूळेच हा कार्यक्रम पारत पडतो. त्यामुळे छात्राध्यापक स्थानिक समाजाशी समरज होउन शाळेचा व समाजाचा शैक्षणिक विकास करण्यासाठी सज्ज होईल.

**संशोधनाची गरज व महत्व :—**

प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा मुलभुत पाया आहे म्हणुन प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे महत्वाचे ठरते. या व्यवसायिक प्रशिक्षणात तात्वीक भागा बरोबर जेंव्हा प्रात्यक्षिक कार्य दिले जाते तेंव्हा त्या ठिकाणी कत्रीम परिस्थीती निम्र्मण केली जाते. त्यामुळे त्या वातावरणात वास्तव परिस्थीतीची जाणिव निर्माण होत नाही. अध्यापकाची क्षमता, कामगिरी, बांधिलकी या तिन श्रेत्राशी शिक्षकाची बांधिलकी महत्वाची असते व वास्तव परिरिथतीत अनूभव घेतल्याशिवाय बांधिलकीची जाणिव निर्माण होत नाही. अनुभव घेतल्याशिवाय शिक्षकाचा व्यवसाय चांगला होउ शकत नाही. हे अनुभव आंतरवासितेत अनिवार्य केले जातात. त्यामुळे छात्रअध्यापकांसाठी आंतरवासिता महत्वपूर्ण

ठरते. म्हणुनच म्हटले आहे "Paractice makes man perfect. " अनुभव हाच खरा शिक्षक असे म्हटले जाते या आंतरवासितातुन छा़त्राध्यापकांना बालकाच्या वर्तनाचा अभ्यास करता येतो म्हणुन आंतरवासिता संबंधी अभ्यास करणे गरजेचे आहे.

संशोधिका अध्यापक विद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत आहे. आंतरवासिता उपक्रमाची अंमलबजावणी व त्यात येणा–या अडचणींचा अभ्यास करणे व तसेच संशोधनाअंती काही उपाययोजना करणे या हेतुने संशोधन कार्य हाती घेत आहे.

**समस्या विधान :–**

अध्यापक विद्यालयातील अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासिता प्रात्याक्षिक कार्य ......एक चिकित्सक अभ्यास

**पारिभाषीक शब्दांच्या व्याख्या :–**

1 अध्यापक विद्यालय :–

''ज्या विद्यालयात प्राथमिक स्तरावरील शिक्षक तयार करण्यासाठी जे सेवापूर्व प्रशिक्षण दिले जाते असे शिक्षणशास्त्र विद्यालय म्हणजे अध्यापक विद्यालय होय.

2 आंतरवासिता :–

''सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणात शिक्षकी व्यवसायाची पूर्व तयारी, शिक्षकी पेशाची माणसिक, बौध्दिक व शारिरिक तयारी ही ज्या सलग दोन आठवडयांच्या शालेय अनुभुती कार्यक्रमाद्वारे होते त्यास आंतरवासिता म्हणतात.''

3 चिकीत्सक अभ्यास :–

''अध्यापक विद्यालयातील आंतरवासिता प्रात्याक्षिक कार्याच्या गुण व दोषांचा अभ्यास.''

**संशोधनाची उदिष्टे :–**

अध्यापक विद्यालय अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासिता प्रात्यक्षिक कार्यासंदर्भात चिकित्सक अभ्यास करतांना संशोधिकेने खालील उदिष्टे मांडली आहेत.

1. अध्यापक विद्यालय अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासितेचे स्वरुप अभ्यासणे.
2. आंतरवासिता नियोजना संदर्भात येणाया अडचणींचा अभ्यास करणे.
3. आंतरवासिता दरम्यान छात्राध्यापकांना येणाया अडचणींचा अभ्यास करणे.
4. आंतरवासिता दरम्यान छात्राध्यापकांनी राबविलेल्या विविध कार्यक्रमांचा आढावा घेणे.
5. आंतरवासिता कालावधी दरम्यान छात्राध्यापक मार्गदर्शक प्राध्यापक यांची प्रतिक्रया जाणणे.
6. आंतरवासिता या प्रात्याक्षिक कार्याचे मुल्यमापन करणे.
7. आंतरवासिता हा उपक्रम प्रभावी होण्यासाठी शिफारशी सुचविणे.

**संशोधनाची गहितके :—**

अध्यापक विद्यालय अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासिता या उपक्रमाचा चिकित्सक अभ्यास करतांना संशोधिकेने खालील गहितके मांडली आहेत.

1. आंतरवासिता उपक्रमामुळे अध्यापक कौशल्ये विकसित होतात.
2. आंतरवासिता प्रात्याक्षिक कार्यात छात्राध्यापकांना नैसर्गिक शालेय वातावरण मिळते.
3. आंतरवासिता हा उपक्रम प्रत्येक विद्यालयात राबविला जातो.

**संशोधनाची कार्यपध्दती :—**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आलेली आहे.सर्वेक्षण पध्दतीतील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे

**जनसंख्या व न्यादर्श :—**

संशोधिकेने सहेतुक नमुना निवड पध्दतीने परभणी व हिंगोली जिल्हयातील मराठी माध्यमाच्या अध्यापक विद्यालयांपैकी 20 अध्यापक विद्यालयांची न्यादर्श म्हणुन निवड केली आहे. प्रतयेक अध्यापक विद्यालयातील द्वितीय वर्षातील 20 छात्राध्यापक व 04 अध्यापकाचार्य यांचा समावेश न्यादर्शात केलेला आहे.

**संशोधनाची साधने :—**

संशोधिकेने संशोधन विषयासंदर्भात माहिती गोळा करण्यासाठी छात्राध्यापकांसाठी व अध्यापकाचार्यासाठी प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली मिश्र स्वरफपाची आहे. सदर संशोधन साधन तयार करतांना मार्गदर्शकाच्या सुचनांचा विचार केला.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :—**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने प्रश्नावली साधनाद्वारे अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापक व अध्यापकाचार्य यांचे कडून माहितीचे संकलन केले. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने माहितीचे अर्थनिर्वचन व विश्लेषण करण्याकरीता शेकडेवारी (%) या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केलेला आहे.

**निष्कर्ष :—**

छात्राध्यापक प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषन व अर्थनिर्वचन करण्यात आले. त्यावरफन पुढील उदिष्टानुसार ठळक निष्कर्ष काढण्यात आले.

**उदिष्ट क्र.1** :— अध्यापक विद्यालय अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासितेचे स्वरुप अभ्यासणे.

बहुतांश अध्यापक विद्यालयात अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासितेचे तात्विक माहिती दिली जाते. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासितेसाठी आवश्यक असणाया पदाधिकारी व समित्यांची नेमणुक करफन त्यांना योगय मार्गदर्शन केले जाते.

**उदिष्ट क्र.2** :— आंतरवासिता प्रात्यक्षिक कार्याच्या नियोजना संदर्भात येणाया अडचणींचा अभ्यास करणे.

1. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासितेमधील सर्व समित्यांना आवश्यक साहित्य पुरविले जाते. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासितेमधील सर्व समित्यांना आवश्यक साहित्य पुरविले जाते. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासितेच्या पूर्वनियोजनाला पुरेसा कालावधी दिला जातो.

2. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासितेतील कार्यक्रमांसाठी छात्राध्यापक स्वतः निधी जमा करतात व झाालेल्या खर्चाचा हिशोब ठेवतात.

3. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासितेमधील नियोजीत सरावपाठात संबंधीत शाळेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाचा विचार केला जातो.

**उदिष्ट क्र.3 :— आंतरवासिता दरम्याण प्रत्यक्ष कार्यवाही करतांना छात्राध्यापकांना येणाया अडचणींचा अभ्यास करणे.**

1. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासितेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीत छात्राध्यापकांना अडचण येते. छात्राध्यापकांना संबंधित शाळेत परिपाठाचे नियोजन व आयोजन करतांना अडचणी येतात.

2. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासितेच्या उपक्रम दोन आठवडे राबविला जातो. निम्यापेक्षा कमी अध्यापक विद्यालयात आंतरवासितेच्या उपक्रम दोन आठवडे राबविला जातो.

3. बहुतांश अध्यापक विद्यालयात छात्राध्यापक अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करतात. वर्गाध्यापनात विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळते. छात्राध्यापक शिस्तीचे पालन करतात, छात्राध्यापक शिस्तीचे पालन करतात, छात्राध्यापकामध्ये सहकार्य भावना आढळते.

4. बहुतांश अध्यापक विद्यालयातील आंतरवासिते दरम्याण नेमलेले पदाधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करतात. विज्ञान विषयाचे प्रयोग घेतले जात नाहीत.

5. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासिते दरम्याण छात्राध्यापक शालेय दप्तरांची माहिती, उपस्थित, गळती, स्थगिती या बददल माहिती मिळवितात.

6. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयातील आंतरवासितेदरम्याण घेतल्या जाणा–या परिक्षा इत्यादींचे अहवाल समितीद्वारे ठेवले जाते.

**उदिष्ट क.4 :– आंतरवासिता दरम्याण छात्राध्यापकांनी राबविलेल्या विविध कार्यक्रमांचा आढावा घेणे.**

1. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासिते दरम्याण निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, क्रिडा स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, वादविवाद स्पर्धा घेतल्या जातात. सहशालेय अभ्यासपुरक उपक्रमांचा समावेश केला जातो. सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

2. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासिते दरम्याण वृक्ष दिंडी, पालक सभा, समाजसेवा, जनजागृती, पथनाटय, विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देणारा कार्यक्रम घेतले जात नाही.

अध्यापकाचार्य प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले. त्यावरुन पुढील उदिष्टानुसार ठळक निष्कर्ष काढण्यात आले.

**उदिष्ट क.1 :– अध्यापक विद्यालयात अभ्यासक्रमांतर्गत आंतरवासितेचे स्वरुप अभ्यासणे**

1. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासितेची तात्विक माहिती दिली जाते. आंतरवासितेसाठी आवश्यक असणा–या पदाधिकारी व समित्यांची नेमणूक करफन त्यांना योग्य मार्गदर्शन केले जाते.

निम्यापेक्षा कमी अध्यापक विद्यालयात प्रात्यक्षिक कार्याचे स्वरुप समजावुन सांगतांना छात्राध्यापकांचा आत्मविश्वास कमी पडणे या अडचणी येतात.

**उदिष्ट क.2 :– आंतरवासिता प्रात्यक्षिक कार्याच्या नियोजना संदर्भात येणा–या अडचणींचा अभ्यास करणे.**

1. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासितेकरिता निवड झालेल्या पदाधिका–यांना व समित्यांना त्यांच्या कामाबाबत सविस्तर माहिती दिली जाते. प्रात्यक्षिक कार्याच्या नियोजनात सहअध्यापकाचार्याचे सहकार्य लाभते.

2. निम्यापेक्षा जास्त अध्यापकाचार्यांच्या मते, शालेय कामकाजावर परिणाम होतो म्हणुन शाळा उपलब्ध होण्यास अडचणी येतात.

3. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयातील अध्यापकाचार्यांना प्रात्याक्षिक कार्याच्या पुर्वनियोजनात अडचणी येतात.

4. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासिता उपक्रमातील पदाधिकारी व समित्यात सहभागी होणा–या छात्राध्यापकांची निवड त्यांच्यातील कला गुणांच्या आधारे केलीजाते तर निम्यापेक्षा कमी अध्यापक विद्यालयात वरील निवड ही लॉटरी पध्दतीने केली जाते.

**उदिष्ट क.3 :– आंतरवासिता दरम्याण प्रत्यक्ष कार्यवाही करतांना छात्राध्यापकांना येणा–या अडचणींचा अभ्यास करणे.**

1. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासितेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीत छात्राध्यपकांना अडचण येते. छात्राध्यपकांना संबंधित शाळेत परिपाठाचे नियोजन व आयोजन करतांना अडचणी येतात.

2. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासिता उपक्रम दोन आठवडे राबविला जातो. निम्यापेक्षा कमी अध्यापक विद्यालयात आंतरवासिता उपक्रम एका आठवडयात राबविला जातो.

3. बहुतांश विद्यालयातील छात्राध्यापक अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करतात. वर्गाध्यपनात विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळते. छात्राध्यपक शिस्तीचे पालन करतात, छात्राध्यपकामध्ये सहकार्य भावना आढळते.

4. बहुतांश अध्यापक विद्यालयातील आंतरवासिते दरम्याण नेमलेले पदाधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करतात. विज्ञान विषयाचे प्रयोग घेतले जात नाहीत.

5. बहुतांध अध्यापक विद्यालयात आंतरवासिते दरम्याण छात्राध्यापक शालेय दप्तरांची माहिती, उपस्थिती, गळती, स्थगिती या बददल माहिती मिळवितात.

6. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात आंतरवासितेदरम्याण घेतल्या जाणा–या, परिक्षा इत्यादींचे अहवाल समितीद्वारे ठेवले जाते.

**उदिष्ट क.4 :– आंतरवासिता दरम्याण छात्राध्यापक, मार्गदर्शक अध्यापकाचार्य यांची प्रतिक्रिया जाणणे.**

1. निम्म्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापक व अध्यापकाचार्याच्या मते, शालेय कार्यालयीन दत्पराचा अभ्यास करण्यासाठी कालावधी कती पडतो. छात्राध्यापकामधील सुप्त गुणांना वाव मिळत नाही. दोन आठवडयाच्या कालावधीत छात्राध्यपकात आंतरवासिता उपक्रमांतर्गत उदिदष्ट साध्य होत नाहीत.

2. बहुतांश अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापक व अध्यापकाचार्याच्या मते, दोन आठवडयाच्या आंतरवासिता उपक्रमानंतर, सहा महिण्याच्या आंतरवासितेची आवश्यकता नाही.

3. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासितेदरम्याण अभ्यासपुरक उपक्रम राबविले जाते. उपक्रमा दरम्याण येणा–या समस्या सोडविल्या जातात.

**उदिष्ट क.5 :– आंतरवासिता दरम्याण मुल्यमापन करतांना येणा–या समस्यांचा अभ्यास करणे.**

1. बहुतांश अध्यापक विद्यालयात आंतरवासिता दरम्याण, छात्राध्यापक प्रात्यक्षिक कार्याची नियोजन वही पुर्ण करतात, संपुर्ण दस्तावेज मुल्यमापनासाठी अध्यापक विद्यालयात जमा करतात.

2. बहुतांश अध्यापकाचार्यांना आंतरवासितेतील उदिष्टांची संख्यात्मक व गुणात्मक मुल्यमापन करणे कठीन जाते.

3. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात अध्यापकाचार्य मुल्यमापनाकरिता प्रमाणित कसोटया, निकष सारणीचा वापर करीत नाहीत.

**ठळक संदर्भ ग्रंथ सूची :**

मुळे रा.श. व उमाठे वि.तु. ( 1977) शैक्षणिक संशोधनातील मुलभुत तत्वे नागपुर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ.

डॉ.सौ.चव्हाण, छात्राध्यापक सेवाकाल, प्रकाशन इनसाईट, नाशिक, 30 सप्टेंबर 2008

डॉ.न.रा.पारसनिस, शिक्षकांचे प्रशिक्षण, नुतन प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 2004.